काकडी

निकोलाई नोसोव

चित्र: इवान सेम्योनोव

मराठी: अश्विनी बर्वे




काकडी

निकोलाई नोसोव

चित्र: इवान सेम्योनोव

मराठी: अश्विनी बर्वे










एक दिवस पावलिक त्याचा मित्र कोल्याला घेऊन मासेमारी करायला गेला. पण त्याचे नशीब फारच खराब निघाले. दिवसभरात एकाही माशाने आकड्याला तोंड लावले नाही. मात्र घरी परतताना त्यांनी सामूहिक मळ्यात जाऊन काकडी तोडली आणि त्यांचे खिसे भरून घेतले. . पहारेकऱ्याने त्यांना पाहून शिट्टी वाजवली. पण मुलं जमेल तितक्या वेगाने पळत सुटली आणि तिथून निघून गेली. ते पुढे गेल्यावर पावलिकला वाटले की घरी पोचल्यावर काकड्या चोरल्याबद्दल आपल्याला फटकारले जाईल, म्हणून त्याने आपल्या काकड्या सुद्धा कोल्याला दिल्या.

"बघ मी तुझ्यासाठी किती काकड्या आणल्या!" समोरचा दरवाजा उघडताच कोल्या ओरडला.



आईने वर पाहिले - कोल्याचे खिसे आणि शर्ट फुगलेला होता आणि त्याच्या हातात दोन काकड्या होत्या ज्या त्याच्या कपड्यांमध्ये बसू शकत नव्हत्या.

"त्या काकड्या कुठून आणल्या?" आईने विचारले.

"बागेतून.""कोणत्या बागेतून?“

"नदीजवळच्या भाजी मळ्यातून.“

"तुम्हाला तिथून काकडी घेण्याची परवानगी कोणी दिली?"




“कोणीही सांगितले नाही, मी स्वतःच त्या काकड्या तोडल्या आहेत.“

"तुला म्हणायचे आहे की तू त्या काकड्या चोरल्या?“

"नाही. मी आत्ताच आणल्या. पावलिकनेही काही काकड्या घेतल्या. मग, मी पण घेतल्या." मग त्याने खिशातून काकड्या काढायला सुरुवात केली.

"थांब! असं करू नकोस," त्याची आई म्हणाली.

“का नाही?"



"तू लगेच काकड्या परत करून ये."

"का? मी तोडल्या तेव्हा त्या वेलींवर होत्या आता त्या परत लावता येणार नाहीत."

"काही हरकत नाही. तुम्ही त्यांना परत देऊन या आणि जिथून तोडल्या तिथे परत ठेवा."

"ठीक आहे, मी बाहेर जाऊन काकड्या टाकून देतो."

"अरे नाही, तू असं करणार नाहीस! तू त्या काकड्या लावल्या नाहीत. तू त्यांना पाणी घातलं नाहीस. आणि म्हणून तुला त्या बाहेर फेकण्याचाही अधिकार नाही."

"पण चौकीदार तिथेच होता. आम्हाला पाहून त्याने शिट्टी वाजवली पण आम्ही पळून गेलो."

"आणि त्याने तुला पकडले असते तर?"




“तो तसे करू शकणार नाही. तो म्हातारा आहे, वेगाने धावू शकत नाही.“

"तुम्हाला लाज वाटली पाहिजे. त्या काकड्यांसाठी चौकीदार जबाबदार आहे. काकड्या गायब झाल्याचं कोणाला कळलं तर ते चौकीदाराला दोष देतील. "आईने काकड्या परत कोल्याच्या खिशात ठेवल्या. "मी जाणार नाही!" कोल्या ओरडला. “त्याच्याकडे बंदूक आहे. तो मला गोळ्या घालेल!”

“तीच तुझी पात्रता आहे. माझ्या मुलाने चोर बनू नये असे मला वाटते?“

"तू माझ्याबरोबर चल आई! मला एकटयाला परत जायला भीती वाटते."



“तुम्ही त्या चोरल्या तेव्हा तुम्हाला अजिबात भीती वाटली नाही, बरोबर?" आई म्हणाली. मग आईने सर्वात मोठ्या दोन काकड्या कोल्याच्या हातात दिल्या आणि त्याला घराबाहेर पाठवले.

“जा, काकड्या परत देऊन य,” आई म्हणाली.

कोल्या गावाच्या रस्त्याने चालू लागला."मी काकडी एका खड्ड्यात फेकून देईन आणि म्हणेन की मला ती परत देऊन आलो," तो स्वतःशी म्हणाला आणि मग त्याने आजूबाजूला पाहिले. "नाही, त्या काकड्या मला कोणीतरी खड्ड्यात फेकताना पाहण्याआधी आणि रक्षक अडचणीत येण्याआधी मी त्या काकड्या परत केलेल्या बऱ्या."



आम्ही रस्त्यावरून जात असताना कोल्या स्वतःशीच बडबडला, "पावलिकला माझ्यासारखा त्रास झाला नाही. त्याने मला त्याच्या काकड्या दिल्या, आणि आता तो घरी आहे आणि कोणीही त्याच्यावर रागावलेले नाही."

कोल्या गावाच्या रस्त्याच्या टोकाला पोहोचला आणि मग शेताकडे निघाला. एवढ्या संध्याकाळी तो कधीच एकटा बाहेर गेला नव्हता आणि यामुळे त्याला थोडे अस्वस्थ वाटू लागले. शेवटी तो नदीच्या काठावरच्या काकडीच्या शेतात पोहोचला.



काकडीच्या शेताच्या टोकाला एक छोटीशी झोपडी होती. चौकीदार तिथेच होता.

कोल्या झोपडीबाहेर उभा राहिला आणि जोरजोरात श्वास घेऊ लागला. चौकीदाराने त्याचा आवाज ऐकला.

"का काय झाले?" बाहेर येऊन चौकीदाराने विचारले.

"मी काकड्या परत आणल्या आहेत."


"कोणत्या काकड्या?"

"पावलिक आणि मी तोडलेल्या. आई म्हणाली परत करून ये."

"बरं, असं आहे," म्हातारा पहारेकरी मोठ्या आश्चर्याने म्हणाला. "म्हणजे, तू तो मुलगा होतास ज्याला मी शिट्टी वाजवली होती. मला माहित नव्हते की तू त्यातून सुटशील. पण तू जे केलेस ते अजिबात चांगले नाही."

"जेव्हा पावलिकने काही काकड्या घेतल्या, तेव्हा मीही काही घेतल्या. आणि नंतर पावलिकने त्याच्या सर्व काकड्या मला दिल्या."

"हे बघ, पावलिकचे सोड. पण खरं कळण्याइतपत तुझं वय झालं आहे. बघ पुढच्या वेळी असं करू नकोस. ठीक आहे, आता मला काकड्या दे आणि तू पळत तुझ्या घरी जाऊ शकतोस."





कोल्याने आपल्या खिशातून आणि शर्टामधून काकड्या काढल्या आणि एका ओळीत ठेवल्या.

“एवढ्याच?" चौकीदार म्हणाला.

"नाही. अजून एक काकडी होती.“

"ठीक आहे? ती कुठे आहे?“

"मी ती खाल्ली. आता तुम्ही माझ्याबरोबर काय कराल?“

"काही नाही. काकडी खाल्ली आहेस मग काय करणार?“

"त्यामुळे तुम्हाला त्रास तर होणार नाही ना?"



“"एक काकडी कमी असली तरी फरक पडणार नाही, पण तू जर या सर्व काकड्या परत आणल्या नसत्या तर मला नक्कीच त्रास झाला असता.“

मग कोल्या वळला आणि धावू लागला. अचानक तो थांबला आणि ओरडला,

"मी तुम्हाला काहीतरी विचारायचे विसरलो!"



“काय?“

"मी खाल्लेल्या काकडीचे काय? मी ती चोरली की नाही?“

“हे बघ,” चौकीदार म्हणाला. "खूप अवघड प्रश्न आहे. बरं, तू चोरी केली नाही असं मानूया.“

"पण मग मी काय केले?"




“ती माझ्याकडून तुला भेट म्हणून समज.“

"धन्यवाद! मी आता घरी जात आहे,

शुभ रात्री.“

कोल्या शेतात आणि छोट्या पुलाच्या पलीकडे पळत सुटला. गावाच्या रस्त्यावर आल्यानंतर तो थांबला आणि मग हळूहळू घराचा उरलेला रस्ता व्यापला. आता त्याला आतून खूप बरे वाटू लागले होते.



अंत